स्वप्ने पाहणार्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १३ मे २०२५ | अंक १५१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# शेतकऱ्यांवर संकट, कांद्याच्या दरात मोठी घसरण, निर्यात पूर्णपणे ठप्प

अवकाळी पाऊस आणि गारपीटमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांसमोर शेतमालाच्या दराचे संकट आले आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या दरात मोठी घसरण होत आहे. त्यात भारत आणि पाकिस्तान दरम्यान निर्माण झालेल्या संकटामुळे भर पडली आहे. आता शेतकऱ्यांचा कांदा हजार रुपयांपर्यंत घसरला आहे. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे. आता नाफेडकडून सुरु होणाऱ्या कांदा खरेदीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. नाशिकमधील लासलगाव बाजार समितीत कांद्याचे दर गडगडले असून शेतकऱ्यांवर संकट आले आहे. कांदा 1 हजार रुपये क्विंटलपर्यंत घसरला आहे. बाजार समितीमध्ये कांद्याची आवक वाढली आहे. दर घसरल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक



फटका बसला आहे. भारत पाकिस्तान दरम्यान युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यातच भारताने पाकिस्तानसोबत होणारी निर्यात बंद केली. त्यामुळे कांद्याचे दर घसरले. तसेच बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे कांदा निर्यातीत घट झाली आहे. तसेच बांगलादेशात 30 टक्क्यांनी अधिक उत्पादन झाले आहे. नाफेड एनसीसीएफ यांनी अद्याप कांदा खरेदी सुरु झाली नाही. नाफेड आणि एनसीसीएफकडून कांदा कधी सुरु होते, त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. कांद्याची आवक जास्त आणि बाजारात कमी मागणी अशी परिस्थिती सध्या आहे. देशांतर्गत कांदाचा पुरवठा वाढल्याने थेट कांदा दरावर परिणाम आहे. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव बाजारात उन्हाळी कांद्याला 1151 रुपये दर मिळाला. नाशिक बाजार समितीत हा दर 900 रुपये होता. येवला बाजार समितीत केवळ 851 रुपये दर मिळाला. मनमाड, पिंपळगाव बसवंत बाजारात 1100 रुपये कांद्याचा दर राहिला. देशात सर्वाधिक कांद्याचे उत्पादन नाशिक जिल्ह्यात होते. आशिया खंडात लासलगाव कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. परंतु गेल्या महिन्याभरात नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. त्याचा फटका कांद्या उत्पादक शेतकऱ्यांनाही बसला. अवकाळी पावसाने शेतात काढून ठेवलेला कांदा, कांदा बियाणे तसेच आंबा पिकाला फटका बसल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे.

# मृद जलसंधारण मंत्री ना.संजय राठोड यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची घेतली आढावा बैठक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : महाराष्ट्र राज्याचे मृद जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांची सासरवाडी असलेल्या परसराम नाईक तांडा परिसरात असलेल्या समस्या बाबत नांदेड जिल्ह्यातील विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांची आज परसराम नाईक तांडा बोथ येथे आढावा बैठक घेऊन ना. मंत्री संजय राठोड विकास आराखडे तयार करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. याबाबत हाती आलेली माहिती अशी की, मृद जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड हे आपल्या सासरवाडी परसराम नाईक तांडा येथे दि. १० मे रोजी त्यांच्या नातेवाईकाकडे लग्नानिमित्त आले असता त्यांना येथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असल्याचे जाणवले त्यावरून त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त करून लगेच दि. १० मे ला मृद जलसंधारण मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांनी नांदेड जिल्हाधिकारी यांच्या नावे आदेश काढून मृद जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड तथा पालकमंत्री यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ मे रोजी दुपारी दोन वाजता लहरी बाबा संस्थान मठाचे सभागृह परसराम नाईक तांडा (बोथ) ता. किनवट जि. नांदेड येथे सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने या आढावा बैठकीमध्ये ना. मंत्री संजय राठोड म्हणाले की, मी स्वतः राज्याचा मंत्री असून माझ्या यवतमाळ जिल्ह्याचा मी पालकमंत्री आहे. माझ्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये ४०० कोटींची कामे शेतकऱ्यांच्या हितासाठी



आम्ही तसेच राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी हिताचे नाला खोलीकरण, गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार, पांदण रस्ते या योजना मोठ्या प्रमाणात आम्ही राबवित आहोत. त्या तुलनेमध्ये नांदेड जिल्ह्यातील किनवट व माहूर या आदिवासी तालुक्यांमध्ये वरील कामांचे प्रस्ताव अतिशय नगण्य आहे. ही खेदाची बाब असून आपण प्रशासकीय अधिकारी असताना याबाबत विकास आराखडे का तयार करत नाही. आमचे सरकार शेतकऱ्यांसाठी पैसे द्यायला तयार आहेत. तेव्हा वरील कामाचे तात्काळ आराखडे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठवावे असे आदेश यावेळी देण्यात आले. तसेच जल जीवन मिशनचे अर्धवट कामे तात्काळ पूर्ण करा अशी तंबी यावेळी संबंधितांना देण्यात आली. पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या घरकुल योजना, मनरेगा या कामाबाबतही सुसूत्रता ठेवण्यासंदर्भात संबंधितांना सूचना केल्या. आणि दरसावंगी ता. किनवट येथील पी. डी. एन. कामाबाबतचे सध्या स्थितीचा आढावा, परसराम नाईक तांडा परिसरातील २५ १५ अंतर्गत मंजूर कामा बाबत, बोथ फाटा ते टिटवी रस्त्याचा अपूर्ण बांधकामा बाबत, श्रीक्षेत्र उनकेश्वर ते बेगमबाई तांडा पांदण रस्त्याबाबत ही कामे तात्काळ चालू करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. या बैठकीला किनवटचे सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्रा दोन्थुला, किनवटच्या तहसिलदार डॉ. शारदा चौंडेकर, माहूरचे तहसिलदार किशोर यादव, विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# आरटीएसई परीक्षेत अदिती जाधवचा राज्यात प्रथम क्रमांक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : जिनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल, माहूर येथील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी कु. अदिती ज्ञानेश्वर जाधव हिने Rationalist Talent Search Exam आरटीएसई २०२५ या राज्यस्तरीय परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळवून माहूर, किनवट व नांदेड जिल्ह्याचा अभिमान वाढवला आहे. अदितीने या परीक्षेत २०० पैकी १९० गुण मिळवत गणित, विज्ञान व सामान्य ज्ञान विषयात आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली. तिला प्रमाणपत्र, पदक आणि शिष्यवृत्ती जून २०२५ मध्ये दिली जाणार आहे. या यशामागे शाळेचे



आधुनिक शिक्षण, शिक्षकांचे समर्पण, वडील ज्ञानेश्वर जाधव यांचे पाठबळ आणि अदितीची मेहनत यांचे योगदान आहे. अदितीचे स्वप्न शास्त्रज्ञ होऊन देशासाठी काहीतरी मोठे करणे आहे. जिनियस किड्स इंटरनॅशनल स्कूल माहूर येथील शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, अदितीचे हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# दहावीचा आज निकाल : दुपारी १ वाजता मंडळाच्या संकेतस्थळावर पाहता येणार निकाल

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल मंगळवार दि.१३-मे रोजी जाहीर होणार आहे.दुपारी १ वाजता मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून काही दिवसांपूर्वीच बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला होता. तेव्हापासूनच दहावीच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना निकालाची उत्सुकता लागली होती. अखेर ही प्रतीक्षा संपली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दि.१३-मे रोजी दहावी बोर्डाचा निकाल जाहीर केला जाईल असे जाहीर करण्यात आले आहे. दहावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल अधिकृत संकेत स्थळावर दुपारी १ वाजता पाहता येणार आहे. त्यानंतर शिक्षण मंडळाकडून नियोजन केलेल्या कालावधीत आपापल्या विद्यार्थ्यांना शाळांमध्ये गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येईल.फेब्रुवारी-मार्च २०२५ महिन्यात दहावीच्या परीक्षा घेण्यात



आल्या होत्या. शिक्षण मंडळाकडून आज दहावीचा निकाल जाहीर केला जाणार असल्याने विद्यार्थ्यांची प्रतिक्षा संपली आहे.

# युवती संस्कार शिबिरातुन आपली संस्कृती आत्मसात करावी- ह.भ.प.नारायण महाराज

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : ह.भ.प.नारायण महाराज माधापूरकर यांच्या संकल्पनेतून युवती संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.नुकतेच बोधडी (बु) या ठिकाणी युवती संस्कार प्रशिक्षण शिबिराच्या उदघाट्न प्रसंगी नारायण महाराज यांनी युवतींनी आपली संस्कृती व संस्कार जोपासत शिक्षण क्षेत्रात मोठे यश प्राप्त करावे व देशाचे नाव लौकिक करावे असा मोलाचा संदेश दिला. आज युवती अनेक क्षेत्रात मोठे यश संपादन करीत आहेत आणि त्यांच्या या यशा सोबत आपली संस्कृती व संस्कार याची जोड असेल तर आपल्या देशाची समाजाची व गावाची प्रतिष्ठा वाढेल व खोट्या भूलथापांना आमिषाला बळी न पडता वेळीच सावध होऊन त्या आपले संरक्षण करू शकतील असा विश्वास महाराजांनी व्यक्त केला.तरुणींनी अनुशासनात



राहिल्यास कुठलीही वाईट घटना त्यांच्यासोबत घडणार नाही. घटना घडण्याच्या अगोदर अनुशासनात राहिल्यास प्रशासनाकडे न्याय मागण्याची वेळच येणार नाही म्हणून युवतींनी या प्रशिक्षण शिबिरात येणे आवश्यक असल्याचे महाराजांनी सांगितले. युवती संस्कार शिबिर तालुक्यातील नागझरी येथे दि.४- मे ते ८-मे रोजी संपन्न झाले असून बोधडी (बु) येथे ९ मे ते १३ मे व बोधडी (खु ) येथे ११ मे ते १५ मे पर्यंत या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून अनेक ठिकाणी ही संस्कार शिबिरे संपन्न होणार आहेत. या शिबिराचे आयोजन महिला सनातन धर्म सेवा समिती तर्फे करण्यात आले आहे.

# परळी न.प.चा भ्रष्टाचार बाहेर काढत माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांचा सत्ताधाऱ्यांना घरचा आहेर

## दिपक देशमुख यांचं म्हणणं सत्ताधारी खोट ठरवतील का ? तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) मागच्या दहा वर्षापासून आमदार धनंजय मुंडे यांच्या ताब्यात असलेल्या परळी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राहिलेल्या दीपक देशमुख यांनी निवेदन देऊन परळी नगर परिषदेमध्ये झाले असलेल्या व होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. हा नक्कीच सत्ताधाऱ्याला घरचा आहेर असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी म्हटले आहे. परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की परळी शहरांमध्ये सरस्वती नदीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून ब्लॅक लिस्टमध्ये असलेल्या गुत्तेदाराला काम दिलेल आहे तसेच परळी शहरांमध्ये करोडो रुपये खर्चून ड्रेनेजचे जे काम झालं आहे त्यामध्ये खूप मोठा भ्रष्टाचार झाला आहे सगळ्यात महत्त्वाचा की परळीतल्या एका रोडवरती अनेक वेळा बिल उचलण्याचा आम्ही ऐकत होतो पण आज



माझी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांची मुलाखत ऐकली असता त्यांनी असं सांगितलं आहे की चांगल्या क्वालिटीचे रस्ते झाले असते तर सात मजली परळी शहरांमध्ये रस्ते झाले असते एवढा भयानक मोठा भ्रष्टाचार रस्त्याच्या कामामध्ये ही झाला आहे याच्यातून एक सिद्ध होत आहे की यापूर्वी परळी नगर परिषदेच्या विरोधामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ,संभाजी ब्रिगेड, वंचित बहुजन आघाडी, एम आय एम ,महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कम्युनिस्ट पक्ष यांच्यासह शहरातील काही सामाजिक कार्यकर्ते छोट्या-मोठ्या सामाजिक संस्था संघटना यांनी नगरपरिषदेच्या भ्रष्टाचारा विरोधात वारंवार निवेदन दिली आंदोलन केले हे अगदी खरे होते. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी म्हटले आहे. म्हणून परळी नगर परिषदेच्या विरोधामध्ये माजी नगराध्यक्ष यांनी जे भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे व दोषीवर कडक कारवाई करावी अशी मागणी सुद्धा परळीकरांच्या वतीने करण्यात येत आहे. जर असं नाही झालं तर यामध्ये सत्ताधारीच काहीतरी षडयंत्र करून पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी खाटाटोप करत आहेत का काय? अशा पद्धतीची शंका परळीकरांच्या मनामध्ये नक्कीच आल्याशिवाय राहणार नाही म्हणून या प्रकरणाची या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी असे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी म्हटले आहे.


# संपादकीय

## पाकला सरळ करणे गरजेचे होते

भारत-पाकिस्तान संघर्षाविषयी सुरुवातीला ङ्गदोन्ही देश लवकरात लवकर मिटवून टाकतीलफ असे म्हणून गेले. त्यांचे उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स यांनी देखील ङ्गया संघर्षाशी आम्हाला काही देणेघेणे नाहीफ असे विधान शस्त्रसंधी जाहीर होण्याच्या साधारण ४८ तास आधी केले होते. प्रत्यक्षात ट्रम्प यांनीच त्यांच्या ङ्गट्रुथ सोशलफ समाजमाध्यम व्यासपीठावरून शनिवारी सायंकाळी शस्त्रसंधीची घोषणा पहिल्यांदा केली. त्यांनी ही घोषणा सर्वांत आधी करणे यात खरा अर्थ दडलेला आहे. ट्रम्प यांच्या सगळ्याच कृत्यांमध्ये नाट्यमयता असते, ती येथेही दिसून आली. शस्त्रसंधीसाठी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ आणि उपाध्यक्ष व्हान्स हे भारत आणि पाकिस्तान यांच्यात चर्चा घडवून आणण्यासाठी जवळपास २४ तास प्रयत्न करत होते. दोन्ही देशांचे पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांच्या संपर्कात होते अशी माहिती ङ्गसीएनएनफ आणि अनेक वाहिन्यांनी दिलेली आहे. ती आपण अद्याप नाकारलेली नाही. त्यांना तसे करू दिल्यानंतर फलश्रुतीचे श्रेय ट्रम्प यांना घ्यायचे होते. त्यात गैर काही नाही. पण आपण त्यांना ते का घेऊ दिले हा प्रश्न. इस्रायल-हमास, रशिया-युक्रेन हे संघर्ष अजूनही धुमसत आहेत. भारत-पाकिस्तानबाबत निदान पहिल्या काही तासांत तसेच घडले. शस्त्रसंधी सायंकाळी पाच वाजल्यापासून लागू झाला, त्याबाबत घोषणा आपल्याकडे सायंकाळी सहा वाजता झाली. पण सात वाजल्यापासूनच जम्मू-काशीर आणि पुढे पंजाब, राजस्थान, गुजरातच्या आकाशात पाकिस्तानचे ड्रोन पुन्हा प्रकटू लागले. जम्मू काश्मीर सीमेवरून पाकिस्तानचा गोळीबारही रीतसर सुरू झाला. तेव्हा शस्त्रसंधीबाबत पाकिस्तान खरोखरच गंभीर आहे का, याविषयी आपल्याकडे रास्त शंका उपस्थित होते आहे. या सगळ्या गोंधळाचा अर्थ लावण्याआधी भारत आणि पाकिस्तान यांच्या शस्त्रसंधीबाबत भूमिकांचे अवलोकन गरजेचे. पाकिस्तानचे पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री यांनी ज्या प्रकारे अमेरिकेचे तोंडभरून कौतुक केले, तसे ते आपण केलेले नाही. शनिवारी दुपारी पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांनी (डीजीएमओ) भारताच्या लष्करी कारवाई महासंचालकांशी संपर्क साधला आणि शस्त्रसंधीचा प्रस्ताव ठेवला, तो आम्ही मान्य केला हीच भारताची अधिकृत भूमिका आहे. सायंकाळच्या पत्रपरिषदेत आपल्याकडून तीच मांडण्यात आली. पण इतका मोठा निर्णय केवळ ङ्गडीजीएमओंफच्या पातळीवर होत नसतो, हे लक्षात घेणे आवश्यक. त्या पत्रकार परिषदेतच हेही स्पष्ट केले गेले की, शस्त्रसंधीविषयी पुढील चर्चा १२ मे रोजी होईल. तरी तोपर्यंत आमची सैन्यदले संघर्षपूर्ण परिस्थितीत अत्यावश्यक असते तशी सज्जता बाळगून असतील. भारताने असे म्हणणे महत्त्वाचे. ते किती समर्पक होते हे या घोषणेनंतर अवघा तास उलटून जायच्या आत पाकिस्तानकडून जे घडले, त्यावरून आकळू शकते. ७ मे रोजी पहाटेच्या आधी भारताने ङ्गऑपरेशन सिंदूरफ कारवाई केली. त्यानंतर ७, ८ व ९ मेच्या रात्रभर पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले सुरू होते. येथे एक बाब विशेष नमूद करण्यासारखी आहे. भारताशी शस्त्रसंधीबाबत मतैक्य होऊनही शस्त्रसंधीचा भंग करणे हे पाकिस्तानसाठी नवीन नाही. पण या वेळी परिस्थिती पाकिस्तानसाठी संघर्षमय आणि धोकादायक ठरत होती. शिवाय या वेळी अमेरिकेने मध्यस्थी केली होती आणि तिचे पाकिस्तान सरकारने - म्हणजे पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्र्यांनी- स्वागत केले होते. प्रस्तुत संपादकीय प्रसिद्ध होईपर्यंत, सोमवारी पहाटे वा नंतर पाकिस्तानकडून आणखी आगळीक झालेली असेल वा नसेल. पण प्रश्न असा की शस्त्रसंधीचा प्रस्ताव पाकिस्तानने दिलेला असेल तर आपण तो स्वीकारला का? असल्यास ते भूषणावह नाही. दोन देशांदरम्यान शेवटचा प्रदीर्घ संघर्ष कारगिलच्या वेळी म्हणजे १९९९ मध्ये झाला; त्या वेळी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पाकिस्तानचे त्या वेळचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यावर दबाव आणला होता. भारतीय फौजांनी आणि हवाई दलाने कारगिल आणि आसपासच्या अतिखडतर टापूमध्ये अतुलनीय कामगिरी करून दीर्घ संघर्षानंतर बाजी पाकिस्तानवर उलटवली हे खरेच. परंतु अमेरिकेचा दबाव नसता, तर त्याही वेळी पाकिस्तानचे तत्कालीन लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांनी भारताच्या कुरापती युद्ध भडकेपर्यंत सुरू ठेवल्या असत्या हे नाकारता येत नाही. नवाझ शरीफ यांचे बंधू शाहबाज शरीफ आज पाकिस्तानचे पंतप्रधान आहेत. तर असिम मुनीर यांच्याकडे पाकिस्तानी लष्कराचे आधिपत्य आहे. त्यांना ङ्गऑपरेशन सिंदूरफमुळे झालेली फजिती पुसून टाकायची संधीच या शस्त्रसंधीने मिळाली. खेरीज ङ्गइस्लामिक अणुबॉम्बफ ची मूठ झाकलेलीच राहिली. संघर्षसमाप्तीबाबत आधीच्या अमेरिकी अध्यक्षांप्रमाणे ट्रम्प गंभीर नाहीत हे दिसत असतानाही मुनीर यांनी त्यांना गळ घातली. ती आपण मान्य केली. त्यांच्या प्रतिमासंवर्धनासाठी संघर्ष सुरूच ठेवणे जसे त्यांना आवश्यक होते तसे पाकिस्तानला ङ्गसरळफ करणे आपल्या राजकारण्यांसाठी गरजेचे होते. भारताच्या प्रतिहल्ल्यांमध्ये रावळपिंडी या पाकिस्तानी लष्कराच्या मुख्यालयानजीकच्या तळालाही लक्ष्य करणे हीदेखील दोन्ही देशांच्या संघर्षात अगदी नवी बाब. पाकिस्तानकडून आगळीक झालीच, तर कितीही महत्त्वाच्या आस्थापनांवर भारताकडून हल्ले होऊ शकतात हा संदेश यातून योग्य ठिकाणी पोहोचवला गेला आहे. पुढील काही दिवस आणि कदाचित काही महिने ङ्गरात्र वैऱ्याची आहेफ हे वचन ध्यानात ठेवावे लागेल. अशा संघर्षांची किंमत चुकवावी लागते. वित्तहानीतून आणि जीवितहानीतूनही. तरीदेखील एका मूल्याविषयी आपली ओळख जगभर कायम आहे. ते मूल्य म्हणजे संयम! आपले प्रत्युत्तर ङ्गसिंदूरफ कारवाईतही संयमी होते. आणि आपल्या सरकारनेही कोणत्याही अभिनिवेशाविना ङ्गसिंदूरफपश्चात निर्माण झालेली स्थिती हाताळली आहे. शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्याची आपली संस्कृती कधीही नव्हती आणि नसेल.

# अपेक्षाभंग

शामराव आणि माया या दोघांचा एकुलता एक मुलगा रवी.शामराव आणि माया हे दांपत्य नागपूरला त्यांच्या फ्लॅटमध्ये राहत होते. रवी पुण्यात एका प्रसिद्ध कंपनीत कामाला होता.त्याचा पगार भक्कम असल्याने त्याने पुण्यात एक फ्लॅट घेतला होता.शिवाय त्याची बायको मनीषा देखील नोकरी करणारी होती.तिलाही चांगला पगार असल्यामुळे त्यांच्याकडे पैशाची काही कमी नव्हती. त्या दोघांचा एक लहान मुलगा होता आदित्य.तो दोन वर्षाचा होता.त्याला दिवसभर पाहायला त्यांनी एक बाई ठेवलेली होती.शिवाय घरातील इतर कामांसाठी दुसरी बाई होती.



एक दिवस शामरावांचे परममित्र विक्रांतजी शामराव आणि माया यांना भेटायला त्यांच्या घरी गेले.त्यांनी दारावरची बेल वाजवताच मायाताईंनी लगेच दार उघडले.मायाताईंनी विक्रांतजींना आदराने सोफ्यावर बसण्यास सांगितले.तितक्यात शामराव सुध्दा तेथे आले. शामराव विक्रांतजींना म्हणाले,'' काय विक्रांत, कसं काय येणं केलं?'' यावर विक्रांतजी शामरावांना म्हणाले,''अरे, मी काही कामानिमित्त पुण्याला गेलो होतो.आजच वापस आलो.तिथे मी रवीला भेटायला त्याच्या घरी गेलो होतो.'' यावर मायाताई विक्रांतजींना म्हणाल्या,'' हो भाऊजी,काल रवीचा फोन आला होता आणि त्याने सांगितले तुम्ही त्याच्याकडे येऊन गेल्याबद्दल.'' विक्रांतजी शामरावांना म्हणाले,'' शाम एक विचारू का?'' यावर शामराव विक्रांतजींना म्हणाले,'' विचार ना.तू काहीही विचारू शकतोस.तुला माझी परमिशन घेण्याची गरज नाही.'' विक्रांतजी शामरावांना आणि मायाताईंना म्हणाले,'' तुम्ही दोघे तुमच्या मुलाकडे जाऊन राहू शकता.पण तुम्ही दोघे खूप महिने त्याच्याकडे जात नाही.तुम्हाला तुमच्या नातवाची आठवण नाही येत का? तुम्ही तेथे राहिले तर त्यालाही तुमचा सहवास मिळेल.मी सहज म्हणून विचारतो आहे.कारण मला ही गोष्ट खटकली.''यावर शामराव विक्रांतजींना म्हणाले,'' नातवाची आठवण तर नेहमीच येते.पण काय करणार? तुला तर माहितच आहे की रवीची बायको नोकरी करते. त्यामुळे ती दिवसभर घराच्या बाहेरच असते.सुनबाईला आम्ही तेथे राहिलेलं फारसं आवडत नाही. तिथे जावून राहणं म्हणजे आपल्यामुळे त्यांना त्रास होतो असंच वाटतं.तिथे आम्ही गेलो की सुनबाई आमच्याशी नीट बोलतही नाही.कधी आम्ही एकत्र आजवर जेवलेलो नाही. कधी गेलो तरी आठ दिवसांत वापस येतो.ते दोघेही आपापल्या व्यापात व्यस्त असतात.आम्हाला वाटतं की आमच्यामुळे त्यांना कुठलाही त्रास होता कामा नये. आम्ही दोघांनीही ठरवलं आहे की जोपर्यंत आमचे हातपाय चालतात तोपर्यंत ठीक आहे. ज्या दिवशी आम्ही काही करू शकणार नाही त्यावेळी आम्ही दोघेही वृध्दाश्रमात जाऊन राहू. पण मुलाकडे जाऊन राहणार नाही.हल्ली मुलांना आणि सूनांना म्हातारे लोक घरात राहिलेले आवडत नाहीत.सर्वच मुले किंवा सूना अशा असतात असे मी म्हणत नाही.परंतु आजकाल बहुतेक घरांमध्ये हेच चित्र आपल्याला दिसतं.'' शामरावांचे बोलणे ऐकून विक्रांतजी त्यांना म्हणाले,'' बरोबर आहे तुझं म्हणणं.आजकालच्या धावपळीच्या जगात आपण आपल्या मुलांकडे हक्काने राहण्याची सोय उरलेली नाही.मला तुझं म्हणणं पटलं की मुलावर ओझं होऊन राहण्यापेक्षा वृध्दाश्रमात राहिलेलं कधीही चांगलं.शिवाय तुम्हाला रवीच्या पैशाचीही गरज नाही.तुम्ही सर्व बाबतीत स्वतंत्र आहात.पण सर्वच वृध्द तुमच्याइतके भाग्यवान नसतात.काहींना नाईलाजाने त्यांच्या मुलांकडे राहावे लागते. कारण त्यांना कुठलीही पैशन वगैरे मिळत नाही.त्यामुळे असे लोक पूर्णपणे आपल्या मुलांवरच अवलंबून असतात. मग मुलांची आणि सूनांची होणारी चिडचिड त्यांना सहन करावी लागते.'' इतक्यात मायाताई चहा घेऊन आल्या.तिघांनीही चहा घेत घेत खूप गप्पा केल्या.

**डॉ.लैलेशा भुरे**
**नागपूर**

# माहेश्वरी समाजाच्या वतीने कॅन्सर लसीकरण

अंबाजोगाई-प्रतिनिधी श्री बांगड माहेश्वरी मेडिकल वेलफेअर सोसायटीच्या सहकार्याने महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा व बीड जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने अंबाजोगाई तालुका माहेश्वरी सभेकडून ९ ते १४ वयोगटातील बालक व १५ ते २६ वयोगटातील तरुण-तरूणींचे कॅन्सर लसीकरण दि.११ व १२ मे रोजी येथील भुतडा हॉस्पीटल मध्ये संपन्न झाले. या लसीकरण कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शुभदा लोहीया (राठी) यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन बीड जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष अ‍ॅड. श्रीकृष्ण तोष्णीवाल, पूनम जाजू, संजय सोनी, डॉ.मनिषा भुतडा, डॉ.अनिल भुतडा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कविता मुंदडा व राजश्री मुंदडा यांच्या महेश वंदनाने झाली. यावेळी बोलताना डॉ.शुभदा लोहीया म्हणाल्या की, भारतात कॅन्सरने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोणत्याही आजारावर उपचाराऐवजी प्रतिबंध हा महत्वाचा असतो. मागील काही वर्षात भारतात कॅन्सरवर लस उपलब्ध झाल्या



आहेत. मात्र त्या महाग असल्याने सामान्य माणसाला न परवडणाऱ्या आहेत. बांगड माहेश्वरी मेडिकल वेलफेअर सोसायटीने ही लस माफक दरात उपलब्ध करून दिली आहे, याचा लाभ माहेश्वरी समाजातील सर्व लाभार्थ्यांनी घ्यावा असे आव्हान त्यांनी केले. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तप्रसाद लोहिया, संचलन सतीश तोष्णीवाल यांनी केले तर आभार विजय नावंदर यांनी मानले. कार्यक्रमाचा शेवट भारतीय शहीद जवान, पहलगाम मधील यात्रेकरु शहिदांना श्रद्धांजली देवून राष्ट्र गीताने झाला. या लसीकरण कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील एकूण १०५ जणांचे लसीकरण करण्यात आले. या लसीकरण कार्यक्रमासाठी जिल्हा सचिव जगदीश जाजू, तालुकाध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, डॉ. मनिषा भुतडा, डॉ. अनिल भुतडा, किरण भंसाळी, शिवकन्या रांदड, रेणू झंवर, उमा बजाज, संतोष भंडारी, कांतीलाल चोकडा, रामानुज मुंदडा, किशोर बाहेती, संजय सोनी, भुतडा, अंबाजोगाई तालुका माहेश्वरी महिला संघटन व अंबाजोगाई तालुका माहेश्वरी युवा संघटन यांचे सहकार्य लाभले

# राज्य सरकारची संरक्षण दलांसोबत बैठक अधिक समन्वयाने काम करणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. १२ - भारत आणि पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत वर्षा निवासस्थानी झाली. या बैठकीत राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चढ्ढा, कर्नल संदीप सील, भारतीय नौदलातर्फे रियर अ‍ॅडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर वाईस मार्शल रजत मोहन बैठकीला




उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची याबरोबरच संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर या बैठकीत चर्चा झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदुर राबविले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलाला मी सॅल्युट करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्वपूर्ण आहे. मुंबई भारताची आर्थिक राजधानी आहे. यापूर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणाऱ्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदान-प्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून अधिक समन्वयाने एकत्रितपणे काम करुया. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव अश्विनी भीडे, सचिव श्रीकर परदेशी, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी, तसेच मुंबई जिह्ला आणि मुंबई उपनगर जिह्लाधिकारी आणि इतर विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## प्लास्टिक पत्रावळीनी हिरावला ग्रामीण रोजगार
## पर्यावरणाला धोका,निसर्गपूर्वक साहित्य
### आरोग्यदायी,रोजगारासाठी इतरत्र स्थानांतरण करण्याची वेळ



मानोरा- प्रतिनिधी सौरभ आडे मानोरा: पूर्वी जेवणात स्वाद आणि संस्कृती दोन्ही जपणाऱ्या पळसाच्या व केळीच्या पानांच्या पत्रावळ्यांना आता प्लॅस्टिकच्या सर्हस वापराने कालबाह्य केले आहे पूर्वी लग्नसमारंभ,सार्वजनिक, घरगुती कार्यक्रमात आवर्जून पानापासून बनलेल्या पर्यावरणपूरक पत्रावळीचा वापर व्हायचा विशेषत्याने लग्नसराईच्या दिवसात पळस आणि मोहाच्या पानापासून निर्मित पत्रावळीतून ग्रामीण नागरिकांना रोजगार मिळत होता पण प्लास्टिक प्लास्टिक पत्रावळीना हा रोजगार दुरावला आहे ग्रामीण भागातही आता मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पत्रावळ्याचा वापर सुरू आहे हा बदल सुलभतेच्या नावाखाली होत असला तरी त्याचे पर्यावरणावर जनावरांच्या आरोग्यावर आणि ग्रामीण संस्कृतीवर गंभीर परिणाम होत आहे तसेच या टाकाऊ पत्रावळ्या जनावरांच्या मृत्यूचे कारण बनत आहे शहरी शहरी व ग्रामीण भागातील सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर टाकलेल्या प्लास्टिक मिश्रित अन्नाचा आस्वाद घेताना अनेक जनावरे हे प्लास्टिकचा गिळून टाकतात त्यामुळे त्यांना अपचन आतड्याची विकृती आणि शेवटी मृत्यूचा सामना करावा लागतो एकीकडे आपण पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा करतो व दुसरीकडे अशा अपायकारक सवयी त्यालाच सुरुंग लावतात.

# बुद्ध पौर्णिमेला वन्य प्राण्यांची गणना होणार...!



वाशिम : बुद्ध पौर्णिमेच्या रात्री १२ मे रोजी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी वन विभागातर्फे पार पडणाऱ्या वन प्राण्यांची गणना करण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील वनपरिक्षेत्रात ही गणना पार पडणार आहे. वन्यजीव रक्षकांनी जंगलात मचाने उभे केले असून या मचनावर बसून वन कर्मचारी पुण्य जीव रक्षक रात्रीच्या वेळी जंगलात शांततेत बसून वन्यप्राणी बिबट्या,ससा,हरिण, काळवीट,नीलगाय, कोल्हा, रान डुक्कर, साळींदर आणि इतर विविध प्राण्यांचे निरीक्षण करणार आहेत. गणना करताना जंगलात असलेले नैसर्गिक तळे मानवाने निर्मित केलेले पानवटे आणि पाझर तलाव छोटे मोठे तळे या ठिकाणांवर बारीक नजर ठेवून गणना केली जाणार आहे. या वन्य प्राण्यांच्या मुलीसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी वनरक्षक वनपाल आणि असंख्य वनमजूर हंगामी वनमजूर या मोजणी प्रक्रियेत सहभागी असणार आहेत. या वन्यप्राणी गणनेमुळे जिल्ह्यातील अनेक प्राणी यांची संख्या वाढली की घटली याची माहिती मिळणार आहे.यामुळे नव्याने प्राण्यांचा आकडा समोर येणार आहे.


## देशाच्या पहिल्या महिला शहीद अधिकारी किरण शेखावत यांना भावपूर्ण श्रद्धांजली



भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर किरण शेखावत या देशाच्या पहिल्या महिला शहीद अधिकारी ठरल्या आहेत. केवळ २७ वर्षांच्या तरुण वयात त्यांनी देशसेवेतील कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त केली.

किरण शेखावत या भारतीय नौदलात अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. एका लढाऊ प्रशिक्षण उड्डाणादरम्यान झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे देशाने एक शूर, समर्पित आणि कर्तव्यनिष्ठ महिला अधिकारी गमावली आहे. त्यांच्या शौर्याला, सेवेला आणि बलिदानाला संपूर्ण देशातून श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. किरण शेखावत यांनी महिलांसाठी लष्करी सेवेचे नवीन दालन उघडले आणि धैर्याचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले. त्यांच्या बलिदानामुळे देशवासी आजही गर्वाने त्यांच्या कार्याचा उल्लेख करतात.

# धम्मभूमी बुद्धविहार येथे बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी




धम्मभूमी बुद्धविहार येथे बुद्ध पौर्णिमा मोठ्या श्रद्धा व उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपासक व उपासिका उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी त्रिसरण व पंचशील घेऊन तथागत बुद्धांच्या जीवनकार्याचा गौरव केला. भिक्खू संघाच्या मार्गदर्शनाखाली ध्यान, बुद्ध वंदना व धम्म देशना घेण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन धम्मभूमी बुद्धविहार समितीच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई व सजावट करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घतले.

# बनवलेल्या गौतम बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना



पाचोड (११ मे २०२५) जगाला शांतीचा आणि करुणेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त पाचोड येथे पंचधातूपासून बनवलेल्या त्यांच्या भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास भुमरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजूनाना भुमरे आणि सरपंच शिवराज भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी परिसरातील बौद्ध बांधव, उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. गौतम बुद्धांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करताना उपस्थित मान्यवरांनी भगवान बुद्धांच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन सुस्थितीत झाले असून स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## "क्षणभंगुर अभिमान"

**असंख्य तारे चमकती आकाशात,**
**तरीही सूर्य म्हणे, "मीच तेजोमय!"**
**क्षणात ढग येती, लपती किरणे,**
**तेव्हा कळते, तोही आहे निर्भरच!**
**मातीचा गोळा — माणूस बनतो,**
**थोडी यशं मिळवून गर्व करतो.**
**"मीच महान!" म्हणत उचलतो मान,**
**पण काळाच्या पावलांखाली झुकतो पुन्हा!**
**देतो देव, घेतोही देव,**
**हे विसरतो, जेव्हा सत्तेवर असतो!**
**"मीच सर्वश्रेष्ठ," या भ्रमात जगतो,**
**अन् एक रोग आला की, अस्तित्व गमावतो!**
**झाड जे झुकतं, तेच फळ देतं,**
**आणि गर्विष्ठ वादळात उन्मळतं!**
**सांभाळ रे मना, तुझा अहंकार,**
**काळापुढे तो क्षणात होईल निराकार!**

**कवी विक्रांत शिरसाट**

# वैष्णवी बावस्कर यांची महाराष्ट्रात एमपीएससी परीक्षेत प्रथम क्रमांकासह विभागीय आयुक्त पदावर निवड



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत वैष्णवी बावस्कर यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावत विभागीय आयुक्त (Deputy Collector) पदावर यशस्वी निवड मिळवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना वैष्णवी बावस्कर यांचा चेहरा अभिमानाने उजळून निघाला होता. त्यांच्या यशामागे कठोर अभ्यास, चिकाटी आणि सातत्य आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. प्रविण रंगारी यांनी सोशल मीडियावर त्यांच्यासोबतचा फोटो शेअर करत गौरव व्यक्त केला आहे "माझी मैत्रीण वैष्णवी बावस्कर हिने एमपीएससी परीक्षेत महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळवून विभागीय आयुक्त पद मिळवले. हार्दिक अभिनंदन!" वैष्णवी यांचे हे यश अन्य विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

## डॉ. संजय पांडुरंग कांबळे यांना "India United National Award" सन्मान
# सामाजिक कार्यातील योगदानाची राष्ट्रीय स्तरावर नोंद





महाराष्ट्रातील प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय पांडुरंग कांबळे यांना India United National Award या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून देशभरातील ३० राज्यांतील ३० कोटी हृदयांचे एकात्मतेचे प्रतीक म्हणून त्यांच्या समाजसेवेची दखल घेण्यात आली आहे. हा पुरस्कार Worthy Wellness Foundation तर्फे प्रदान करण्यात आला असून, "MY INDIA, MY PRIDE" या उपक्रमांतर्गत डॉ. कांबळे यांच्या समाजसेवा, सामाजिक कल्याणासाठीचा समर्पणभाव आणि वंचित घटकांसाठी केलेल्या कार्याचे गौरव करण्यात आला आहे. डॉ. संजय कांबळे यांनी अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून गरजू, वंचित, मागास व दुर्बल घटकांच्या विकासासाठी सतत प्रयत्न केले आहेत. त्यांची सामाजिक बांधिलकी, सहकार्यशील वृत्ती आणि संवेदनशीलता यामुळे ते अनेकांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. या पुरस्काराने त्यांना सामाजिक कार्याची अधिक प्रेरणा मिळाली असून, त्यांनी भविष्यातही समाजासाठी अधिक प्रभावी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

# श्री श्री रविशंकर गुरुजींच्या जन्मदिना निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त लोईदान (रक्तदान) शिबिराचे आयोजन करण्यात आले. "जन्मदिन साजरा न करता, रक्तदान करून जीवनदान देऊ या" या संकल्पनेतून आयोजित या शिबिरात अनेक अनुयायांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिरात सहभागी होऊन अनेकांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान करणाऱ्यांमध्ये श्री शेतु भेलाके यांचाही समावेश होता. त्यांनी स्वतः पुढाकार घेत इतरांनाही रक्तदानासाठी प्रेरित केले. या उपक्रमात सहभागी सर्व रक्तदात्यांना आयोजकांकडून प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले.

# शिक्षण विभागाचा मोठा निर्णय; बोगस शिक्षकांबरोबरच संस्थाचालकाच्या मनमानीला चाप बसणार



शिक्षण विभागाने राज्यात मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे नियमबाह्य आणि बोगस शिक्षकांबरोबरच, संस्थाचालकांच्या मनमानीला देखील चाप बसणार आहे. शिक्षण विभागाने संचमान्यतेनुसार शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची मॅपिंग प्रक्रिया सुरू केली आहे. तसा आदेशच काढला आहे. या आदेशामुळे राज्यातील शिक्षण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे. शिक्षण विभागाने घेतलेल्या या निर्णयानुसार राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांतील लाखो शिक्षक (Teacher) आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांचे प्रथमच मॅपिंग होणार आहे. वेतन आणि मंजूर पदे याबाबत शिस्त लावण्यासाठी शिक्षण विभागाने हे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. संचमान्यतेनुसार मंजूर पदे आणि वेतनासंबंधीची माहिती जूनपर्यंत एकत्र केली जाणार आहे. ही माहिती न भरणाऱ्या शिक्षकांना वेतनाला मुकावे लागणार असल्याचा सज्जड इशाराच दिला आहे. शिक्षण विभागाने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांची मॅपिंग प्रक्रियेची जबाबदारी संबंधित शाळा (School) आणि मुख्याध्यापकांवर निश्चित केली आहे. यासाठी नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटर (एनआयसी) च्या संचमान्यता 'एपीआय'चा (ॅप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस) वापर करण्यात येणार आहे. शालार्थ प्रणालीचे अद्ययावतीकरण करून संचमान्यतेतील उच्चतम मान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांसाठी वेतन काढले जाणार आहे. या प्रणालीत नसलेल्या शिक्षकांचे वेतन रोखले जाणार आहे. या आदेशामुळे शिक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे. राज्यातील शाळांना मे महिन्याची सुटी आहे. या कालावधीतच ही माहिती भरली जाणार असून, त्यानंतर जूनचे वेतन या नवीन प्रणालीद्वारे काढले जाणार आहे. यासंदर्भातील सूचना आणि आदेश राज्यातील सर्व शाळा आणि मुख्याध्यापकांना देण्यात आल्या आहेत. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सहसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी या माहितीला दुजोरा दिला. संचमान्यता आणि शालार्थ प्रणालीमार्फत शिक्षकांना वेतन अदा केले जाते. अनेकदा ताळमेळ नसल्याने काही खासगी संस्थाचालक बोगस माहिती आणि पदे मंजूर नसलेल्या शिक्षक, शिक्षकेतरांची अधिकची नावे सादर करत होते. ही नावे शाळांकडून ऑफलाइन पद्धतीने कागदावर सादर केली जात होती. त्यात अनेकदा पदे कमी अथवा जास्त होण्याचे प्रकार निदर्शनास आले होते. या प्रकाराला यामुळे चाप बसेल, यामुळे ही मॅपिंग पद्धत वापरली जात आहे.

## ग्रामीण रुग्णालयातील सुविधा समाधानकारक
# पोलीस निरीक्षक व पाटलांचा दौरा



– शासनाच्या सामान्य ग्रामीण रुग्णालयात दिनांक १० मे रोजी पोलीस निरीक्षक प्रविण शिंदे व तालुक्यातील पोलिस पाटील यांनी अचानक भेट देत कामकाजाचा आढावा घेतला. या वेळी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. ललित हेडा यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. डॉ. हेडा यांनी सांगितले की, ग्रामीण रुग्णालयात सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध असून, ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना उपचार मिळत आहेत. जनतेचा आरोग्यावरील विश्वास वृद्धिंगत व्हावा, यासाठी रुग्णालय कटिबद्ध आहे. पोलीस निरीक्षक प्रविण शिंदे यांनी पोलिस पाटलांसह रुग्णालयाचा दौरा करून रुग्णांची विचारपूस केली. त्यांना दिलेल्या सेवा समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामस्थांनाही रुग्णालयातील सेवेबाबत समाधान आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. अंतिमतः डॉ. ललित हेडा यांनी सांगितले की, पोलीस पाटील आणि नागरिकांच्या सूचनांनुसार रुग्णालयात आणखी सुधारणा करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# भारताचा पराक्रम, पाकिस्तानने चीनच मार्केट आणि इज्जत दोन्ही घालवली

पाकिस्तानचा सध्याचा जवळचा मित्र म्हणजे चीन. अमेरिकेपेक्षा पण पाकिस्तानला आज चीन जास्त जवळचा वाटतो. पाकिस्तान आपल्या बऱ्याच गरजांसाठी चीनवर अवलंबून आहे. पाकिस्तानची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट आहे. त्यामुळे आर्थिक मदतीसाठी पाकिस्तान जागितक बँक, अमेरिका आणि चीनवर अवलंबून आहे. चीन सुद्धा भारताच्या वाढत्या वर्चस्वाला रोखण्यासाठी पाकिस्तानचा आपल्या सोयीनुसार वापर करत असतो. दहशतवादामुळे पाकिस्तानची जगामध्ये विश्वासहर्ता संपली आहे. पाकिस्तानला कुठल्याही देशाकडून अत्याधुनिक सैन्य तंत्रज्ञान मिळत नाही. त्यामुळे आज पाकिस्तान आपल्या संरक्षण गरजांसाठी मोठ्या प्रमाणात चीनवर अवलंबून आहे. पाकिस्तानकडे ड्रोनपासून ते मिसाईल, फायटर जेट चिनी बनावटीची आहेत. नुकताच तीन दिवस भारत-पाकिस्तानमध्ये सैन्य संघर्ष झाला. मूळात भारताने दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई केलेली. पण पाकिस्तानने दहशतवाद्यांविरुद्धची लढाई आपली लढाई मानून भारताबरोबर युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण केली. पाकिस्तानला याची किंमत चुकवावी लागली आहे. तीन दिवसाच्या या लढाईच्या निमित्ताने भारताने आपलं आधुनिक युद्ध कौशल्य



जगाला दाखवून दिलं. पाकिस्तानवर मात केली. कालप्रमाणे आजही भारताच्या DGMO सैन्य दलांची पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत इंडियन एअर फोर्सच्या अधिकाऱ्यांनी चिनी बनावटीच्या पाकिस्तानी शस्त्रांची काय हालत केली, ते पुराव्यासह दाखवून दिलं. चीनवर नामुष्की झेलण्याची वेळ चिनी बनावटीची मिसाइल, रॉकेट, ड्रोन्स भारताच्या अभेद्य एअर डिफेन्स सिस्टिमने हवेतच नष्ट केली. त्यांचे अवशेष पुरावे म्हणून दाखवले. यात चीनच्या घातक PL-15 मिसाइलचा ढिगारा दाखवला. चीनच एक शस्त्र भारताविरुद्ध चाललं नाही. चीनने अत्याधुनिक शस्त्रास्त्र निर्मितीचे दावे करत आहे. त्यांच्याकडे पाचव्या पिढीच स्टेल्थ विमान आहे. आता ते अमेरिकेच्या आधी सहाव्या पिढीच फायटर जेट विकसित करत आहेत. पण खरोखर चीनच्या या सर्व शस्त्रांमध्ये दम आहे का? असा प्रश्न निर्माण झालाय. तीन दिवसांच्या या लढाईत भारताने चिनी शस्त्रांना त्यांची जागा दाखवून दिली. चीन पण अनेक देशांना शस्त्रांची निर्यात करतो. त्यांच्या या बाजारपेठेला, विश्वसनीयतेला फटका बसू शकतो. पाकिस्तानमुळे चीनवर ही नामुष्की झेलण्याची वेळ आली आहे.

## पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील शेतकऱ्यांची रेन्यु पावर कंपनीकडून फसवणूक ; आंब्याची झाडे तोडली पिकांची नासाडी ; जिल्हाधिका-यांना लेखी तक्रार करुनही १ रुपयाही नुकसान भरपाई मिळाली नाहीच :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा:- ( दि. १२ ) पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांची पवनचक्की कंपन्यांकडुन करण्यात आलेल्या फसवणुकीचे दररोज नवनवीन प्रकार उघडकीस येत आहेत. पाटोदा तालुक्यातील बेनसुर येथील शेतकरी राजाभाऊ दशरथ सगरे यांच्या मालकीच्या ताब्यातील गट नंबर ५६८ मधील १ हेक्टर ३२ आर मधुन रेन्यु पावर कंपनीची टावर लाईन टाकलेली आहे.त्याच गट नंबर मध्ये मोठा लाईटचा टावर उभा करण्यात आला आहे. वर्षभरापूर्वी टावर उभा करण्यासाठी लागणारी क्रेन , जेसीबी, मशिन, ट्रॅक्टर,हायवा,ट्रक आदि यंत्रसामुग्री



नेताना आंब्याची १० वर्षांपूर्वीची ३ झाडे व विद्युत तारा ओढताना ५ झाडे तोडण्यात आली आहेत.तसेच तेव्हा कांदा पिकाचे नुकसान केलेले आहे. राजाभाऊ सगरे यांना झाडांची व कांदा आणि मिरची पिकाची झालेली नुकसान भरपाई देण्याचे कबुल केले होते. विशेष म्हणजे कोणत्याही कागदपत्रांवर सगरे यांची स्वाक्षरी सहमती नाही. त्यांनी कंपनीकडे वारंवार नुकसान भरपाईची मागणी करूनही नुकसान भरपाई न मिळाल्याने दि.१३.०३.२०२५ रोजी जिह्लाधिकारी बीड यांना लेखी तक्रार दिली.परंतु यावर अद्याप जिह्ला प्रशासनाने दखल घेतली नाही. आज दि.१२ सोमवार रोजी रेन्यु पावर कंपनीचे खंडाळा येथील कार्यालयात गेलो असता त्यांनी पुर्वीचे अधिकारी बदलुन गेले आहेत त्यामुळे तुम्ही आणि ते बघुन घ्या असे म्हणत पेपरला बातम्या देऊ नका नाहीतर वाईट परिणाम होतील अशी धमकी सुद्धा दिली असे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी संवाद साधताना सांगितले. एकंदरीतच जिह्ला आणि पोलिस प्रशासन जर पवनचक्की कंपन्यांच्या दावणीला बांधले गेले असेल तर दाद कोणाकडे मागायची असा उद्विग्न सवाल राजाभाऊ सगरे यांनी केला आहे.

## गर्भारलेल्या मातीतून काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा संपन्न

प्रतिनिधी - जगदीप वनशिवनाशिक - येथील आदर्श शिक्षिका कवयित्री,सीमा राणी बागुल यांचा गर्भारलेल्या मातीतून या काव्यसंग्रह प्रकाशन सोहळा नाशिक सिडको मधील नारायण सुर्वे कवी कट्टा सभागृहात संपन्न झाला येथे ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कोळगावकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत वानखेडे ज्येष्ठ साहित्यिक डॉ, प्रमोद काकडे अमरावती, प्रकाशक तानाजी खोडे सर मा. रविकांत शार्दुल तात्या गझलकार कवी बाळासाहेब गिरी, मुखपृष्ठ कार खुशी मोरे, सीमाराणी बागुल यांच्या प्रमुख उपस्थितीत. पुस्तक प्रकाशनाचे सोहळा प्रास्ताविक कवी राज शेळके यांनी केले.मनोगत कु.खुशी मोरे, व सीमा राणी बागुल यांनी केले.चंद्रकांत वानखेडे यांनी आपल्या भाषणातून गर्भारलेल्या मातीतून वेदनेचा हुंकार कवितांमधून आला आहे. स्त्रीचे जगणं दुःख आणि दुःखाचे कंगोरे नेमकेपणाने बागुल यांनी शब्दात मांडले आहे. तसेच कवी संमेलनाचे परीक्षक जयश्री वाघ, रविंद्र दळवी यांनी केले. कविता सादरीकरणात प्रथम शुभांगी पाटील, द्वितीय सोमदत्त मुंजवाडकर, तृतीय गजानन उफाडे यांना सन्मान चिन्ह गुलाब पुष्प शाल देऊन सन्मान करण्यात आला.

## पिठ्ठी ग्रामपंचायत उपसरपंच पदी सुरेश वादगे यांची निवड



पाटोदा प्रतिनिधी :-पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथील ग्रामपंचायत उपसरपंच पदी श्री सुरेश प्रभाकर वादगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व यावेळी उपस्थित पिठ्ठी गावातील सरपंच मंगलताई प्रभाकर कवठेकर, व डॉक्टर प्रभाकर कवटेकर, शिवाजी कवटेकर बळीराम गाडे, शिवाजी गाडे,गणेश कुडके सर, सदस्य ग्रामपंचायत सुशील गाडे, कचरू तुपे, राहुल कवटेकर, बाळासाहेब इंगोले ( फौजी), गणप्रमुख नानासाहेब कवटेकर, उत्तम वादगे, अक्षय कुकडे ,बाबासाहेब वादगे, अशोक कुडके, राम तुपे,, व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## नविन पिढीला मराठी इतिहासाची ओळख करून द्यायला हवी - कवी संमेलनाध्यक्ष डॉ. राजश्री बोहरा

महाराष्ट्रातील प्रत्येक भाषिक शाळेत शिवकालीन इतिहास शिकवायला हवा. नवीन पिढीला मराठीपण जगायला शिकवले पाहिजे. घराघरांतून जिजाऊचे संस्कार रुजायला हवेत, वाचन प्रतिभा पुन्हा नव्याने वाढायला हवी. असे मनोगत कवी संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. राजश्री बोहरा यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद तर्फे ३१वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन दिनांक ९ आणि १० मे रोजी कराड येथील यशवंतराव चव्हाण साहित्य नगरीत संपन्न झाले. याप्रंगी कवी संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. राजश्री बोहरा यांनी उपस्थितांना संबोधित करून नवीन विचारांची पेरण केली आहे. या प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या नेतृत्वाखाली या संमेलनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. सिक्कीमचे माजी



राज्यपाल श्रीनिवास पाटील, माजी कृषीमंत्री श्री लक्ष्मणराव ढोबळे, लोकशाही न्यूज चॅनलचे संपादक श्री विशाल पाटील व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील एकूण ६५० पेक्षा जास्त कवी साहित्यिकांनी या साहित्य संमेलनात सहभाग नोंदवला. पाकिस्तानला वारंवार कर्ज घेण्याची गरज का पडली? भारत आणि पाकिस्तानला एका दिवसाच्या अंतरानं स्वातंत्र्य मिळालं. मात्र भारतानं आज मोठी भरारी घेतली आहे, जगामध्ये आपली एक वेगळी ओळख बनवली आहे. मात्र दुसरीकडे दहशतवादानं पाकिस्तानला पोखरून काढलं आहे. दहशतवाद आणि अंतर्गत कलहामुळे पाकिस्तानची आर्थव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे, सध्या स्थितीमध्ये त्यांची विदेशी गंगाजळी बांगलादेशपेक्षाही कमी आहे. पाकिस्तानला आयएमएफकडून तसेच इतर राष्ट्रांकडून जे फंडिग मिळालं, ते विकास करण्यासाठी मिळालं, मात्र पाकिस्तानने त्याचा उपयोग दहशतवाद्यांना पोसण्यासाठी केला. त्यामुळे आता पाकिस्तान कर्जबाजारी बनला आहे.

# तुर्कीच्या सफरचंदावर पुण्यातील व्यापाऱ्यांचा बहिष्कार, तुर्कीने पाकला पाठिंबा दिल्यामुळे व्यापारी आक्रम

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात 26 निष्पापांचा मृत्यू झाला, त्याचा बदला घेण्यासाठी बारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकव्याप्त काश्मीर आणि पाकमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. मात्र त्यानतंर पाकने कुरापती करत भारतावरच उलटून हल्ला केला. त्या हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देत भारताने पाकिस्तानचे सर्व हल्ले परतवून लावले आणि त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. भारत पाकमधील तणावाच्या परिस्थितीदरम्यान जगातील बहुतांश देशांनी दहशतवादाचा निषेध करत भारताला पाठिंबा दर्शवला. मात्र काही कुरापती देशानी दहशतवाद पोसणाऱ्या पाकचीच तळी उचलून धरली. तुर्की हा पण त्यापैकीच एक. याच पार्श्वभूमीवर पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्कीला भारतीय व्यापाऱ्यांनी धक्का दिला आहे. 'बॅन तुर्की' म्हणत व्यापाऱ्यांनी तुर्कीच्या सफरचंदांवj बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे तुर्की सफरचंद बाजारातून गायब झाली आहेत. परिणामी इराणमधून येणाऱ्या सफरचंदांचे दर वाढले आहेत. घाऊक बाजारात 10 किलो सफरचंदामागे 200 ते 300 रुपये, तर किरकोळ बाजारात प्रति किलो 20 ते 30 रुपये दराने वाढ झाली आहे. तुर्कीच्या भूमिकेमुळे सफरचंदावर बहिष्कार, व्यापारी आक्रमक तुर्कीने पाकला पाठिंबा दिल्यामुळे भारतातील व्यापारी आक्रमक झाले आहेत. त्यामुळे आता व्यापाऱ्यांनी तुर्की सफरचंदाऐवजी इराण, वॉशिंग्टन आणि न्यूझलँड सफरचंदाला पसंती दिली आहे. इराण, वॉशिंग्टन आणि न्यूझलँड सफरचंदाच्या भावात पेटीमागे 200 ते 300 रूपयांची वाढ झाली असल्याची माहिती मार्केट यार्डातील सफरचंदाचे आडतदार, श्री गुरुदेव दत्त फ्रूट एजन्सीचे सत्यजित झेंडे यांनी दिली. मार्केट यार्डात देशासह परदेशातून सफरचंदाची आवक होत असते. भारत-पाकिस्तान तणावामुळे परदेशातील सफरचंदाच्या व्यवहारा वरही परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. जगभरातून विविध देशांकडून भारताला पाठींबा मिळत असताना तुर्कीने पाकिस्तानला पाठिंबा दिला. मात्र यामुळे भारतातील व्यापारी चांगलेच भडकले असून दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकला पाठिंबा देणाऱ्या तुर्कीबद्दल व्यापाऱ्यांनी बॅन तुर्की हा ट्रेंड चालवला आहे. त्याअंतर्गतच तुर्की सफरचंदांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदा उत्पादन कमी असले तरी यंदा भारत-पाकीस्तान युध्दजन्य परिस्थीतीत तुर्कीने पाकिस्तानला पाठींबा दिला. त्यामुळे अनेक व्यापाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत तुर्कीकडून खरेदी बॅन केली असून व्यापाऱ्यांनी आपला देशा,




आपलं राष्ट्र प्रथम ही भूमिका घेत, देशासाठी तुर्कीकडून खरेदी करणे टाळले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com